**L. A. BILL No. I OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

## सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६५ चा महा. ४०.

**आणि ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता;

२०२५ चा महा. अध्या. १३.

(शा.म.मु.) एच-२९१२–१ (१०००–२-२०२६)

H 2912 (Marathi).indd 1 2/24/2026 2:20:34 PM

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१अ-१अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५१अ-१अ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

"(३अ) (एक) जर कोणतीही व्यक्ती, अध्यक्ष म्हणून व परिषद सदस्य म्हणून निवडून आली तर, तिला, एकाच वेळी, दोन्ही पदे धारण करता येतील.

(दोन) एकाच वेळी अध्यक्षाचे व परिषद सदस्याचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीस, एकतर, अध्यक्ष म्हणून किंवा परिषद सदस्य म्हणून केवळ एकच मत देता येईलः

परंतु, समसमान मते पडल्यास, अध्यक्षास निर्णायक मत देता येईल.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-१अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-१अ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३अ) (एक) जर कोणतीही व्यक्ती, अध्यक्ष म्हणून व पंचायत सदस्य म्हणून निवडून आली तर, तिला, एकाच वेळी, दोन्ही पदे धारण करता येतील.

(दोन) एकाच वेळी अध्यक्षाचे व पंचायत सदस्याचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीस, एकतर, अध्यक्ष म्हणून किंवा पंचायत सदस्य म्हणून केवळ एकच मत देता येईलः

परंतु, समसमान मते पडल्यास, अध्यक्षास निर्णायक मत देता येईल.".

H 2912 (Marathi).indd 2 2/24/2026 2:20:34 PM

२०२५ चा महा. अध्या १३.

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

H 2912 (Marathi).indd 4 2/24/2026 2:20:34 PM

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याची कलमे ५१अ-१अ व ३४१ब-१अ यांमध्ये, अनुक्रमे, नगर परिषदांच्या व नगर पंचायतींच्या अध्यक्षांच्या थेट निवडणुकीची तरतूद केली आहे.

**२.** नगर परिषदेचे व नगर पंचायतींचे सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असणारी व्यक्ती, तिचा अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास देखील पात्र असते. म्हणून, एखाद्या व्यक्तीस, एकाच वेळी अध्यक्ष म्हणून व सदस्य म्हणून देखील निवडणुका लढविता येतील आणि दोन्ही पदांवर देखील निवडून येता येईल. अशा दोन्ही पदांवर निवडून आलेल्या व्यक्तीस, दोन्ही पदांसाठी जनादेश मिळालेला असतो. अध्यक्ष म्हणून अप्रत्यक्षपणे निवडून आलेली व्यक्ती, सदस्य म्हणून देखील राहते आणि एकाच वेळी, अध्यक्ष व सदस्य म्हणून देखील काम करते.

म्हणून, थेट निवडून आलेल्या अध्यक्षास, सदस्य म्हणून राहणे देखील शक्य व्हावे असे शासनास इष्ट वाटले. म्हणून, थेट अध्यक्ष म्हणून व सदस्य म्हणून निवडून आलेल्या व्यक्तीस, एकाच वेळी, दोन्ही पदे धारण करता यावीत अशी स्पष्ट तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमाची कलमे ५१अ-१अ व ३४१ब-१अ यांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते. अशा व्यक्तीस, एकतर अध्यक्ष म्हणून किंवा सदस्य म्हणून केवळ एकच मत देता येईल आणि समसमान मते पडल्यास, अध्यक्षास निर्णायक मत देता येईल अशी तरतूद करण्याचे देखील प्रस्तावित केले होते.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. १३) हा प्रख्यापित केला होता.

**४.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १० फेब्रुवारी, २०२६.

**एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (नगरविकास).

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.]**

**[महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (नगरविकास).]

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१ ,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई